Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education Kolhapur Divisional Board Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

कोविमं/डीपी/प्रकटन/ 3868
दिनांक - ०४/११/२०२५

07 NOV 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व क.महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु.-मार्च २०२६ परीक्षेचे अंतिम वेळापत्रक जाहीर करणेबाबत...**

**संदर्भ :-** राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-६/३६९६ दि.३१.१०.२०२५

फेब्रु.-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे अंतिम वेळापत्रक जाहीर करणेबाबतच्या प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे. सदर प्रकटनाच्या अनुषंगाने आपल्या शाळेतील व क.महविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांना परीक्षेचे वेळापत्रक अवगत करावे व पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 06-11-2025 16:09:09

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबतः प्रकटन**

MSBSHS/1637/2025-KOPDB-12-DP 	I/1526329/2025

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

## ॥ प्र क ट न ॥

फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | तपशील | लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी, २०२६ ते बुधवार, दि. १८ मार्च, २०२६ |
| | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा ( माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह ) | शुक्रवार, दि. २३ जानेवारी, २०२६ ते सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी, २०२६ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी, २०२६ ते बुधवार दि. १८ मार्च, २०२६ |
| | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ( शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह ) | सोमवार, ०२ फेब्रुवारी, २०२६ ते बुधवार, १८ फेब्रुवारी, ०२०२६ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.३१/१०/२०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच सोशल मिडीया किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/१०/२०२५

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.